**दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, सांगोला यांचे न्यायालयात**

**नियमित दिवाणी मुकदमा नं. १९१/२०१४**

**निशाणी ६६ लगत आदेश**

(रुक्मीणी विरुध्द प्रल्हाद व इतर)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी ८ यांनी त्यांचे विरुध्द पारीत झालेला विना कैफियत चौकशी आदेश रद्द होणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी अर्जात असे कथन केले आहे की, सदर दावा वादीने प्रतिवादी विरुध्द सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स प्राप्त झालेवर ते दि. ०५/०१/२०१५ रोजी वकीलांमार्फत हजर झाले होते, परंतु प्रतिवादी हे मुंबई येथे नोकरी व व्यवसायासाठी काम करीत असून त्यांना कोर्टात हजर राहणे शक्य झाले नाही. तसेच त्यानंतर कोरोना विषाणुमुळेही प्रतिवादी यांना न्यायालयात हजर रहाता आले नाही. त्यामुळे प्रतिवादी ८ यांचे विरुध्द दि. ०९/०६/२०१५ रोजी विना कैफियत चौकशी आदेश पारीत झालेला आहे. सदरचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. सदरचा आदेश रद्द न केलेस प्रतिवादी यांचे अपरीमित नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी ८ यांनी त्यांचे विरुध्द पारीत झालेला विना कैफियत चौकशी आदेश रद्द करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दिले आहे व प्रतिवादींचा अर्ज नाकारला आहे. वादीचे कथन की, अर्जातील मजकुर खोटा आहे. वादी ही महिला

असल्याने तिला त्रास देण्यासाठी अर्ज दिला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा.

४. पुढील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात. त्यांचेवरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह नोंदवत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ बाबत –**

५. प्रस्तुतचा अर्ज, वादी व प्रतिवादीचे वकीलांचे म्हणणे व दोन्ही पक्षातर्फे युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी यांनी त्यांच्या विरुध्द झालेला विना लेखी कैफियतचा आदेश रद्द करुन मागितला आहे. वादीच्या वकीलांनी म्हणणे दाखल करुन आक्षेप असल्याचे नमुद केले आहे.

६. प्रतिवादीतर्फे अर्जात नमुद केलेली कारण संयुक्तिक वाटत असल्या कारणाने तसेच नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार दोन्ही पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची पुरेपुर संधी देण्यात यावी. जर प्रतिवादी त्याच्या लेखी कैफियतीशिवाय प्रकरण चालले तर त्याच्या हक्कास बाधा पोहचू शकते. याउलट प्रतिवादी यांना लेखी कैफियत दाखल करण्याची संधी दिली तर वादीचे अतोनात नुकसान होणार नाही. म्हणून प्रतिवादींचा अर्ज मंजूर होण्यास

पात्र आहे. करीता मी मुद्दा क्र. १ यास होकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**मुद्दा क्र २ करीता –**

७. मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदविल्याने प्रतिवादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करीता मुद्दा क्र. २ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज प्रतिवादी क्र. ८ यांनी **रु. १००/–** दंड देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी खर्चाचे रकमेपैकी रु. १००/– शासन नावे न्यायालयात जमा करावेत.

३. सदर आदेशाची पुर्तता केलेवर प्रतिवादी यांचे विरुध्द पारीत झालेला विना कैफियत चौकशी आदेश रद्द करण्यात येतो.

SANJAY MOTIRAM GHUGE
Digitally signed by SANJAY MOTIRAM GHUGE
Date: 2024.11.28 10:44:57 +0530

सांगोला.
दिनांक – २६/११/२०२४.

(श्री. संजय मो. घुगे)
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | A. A. Chavan |
| (b) | Court | : | Shri Sanjay M. Ghuge, Civil Judge, J.D.& J.M.F.C., Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 26/11/2024 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 27/11/2024 |